# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## ब-प्रभाग कार्यालय, चिंचवड, पुणे – ४११ ०३३.

**Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in**

**दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३**

**जावक क्र.-बप्र/२/कावि/३०७/२०१३** **दिनाक – १३/११/२०१३**

मा. श्री/श्रीमती --------------------------
सदस्य/सदस्या, प्रभाग क्र.----------------
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

**विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. २१/११/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.**

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि. २१/११/२०१३ रोजी दु. १२.१५ वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. ९

दिनांक : २१/११/२०१३.                                    वेळ : दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक २१/११/२०१३. रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

विषय क्र. १. ब प्रभाग कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२१ (प्रभागाचे नाव- दळवीनगर) चा समावेश होतो सदर प्रभागा मध्ये म.न.पा.चे स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान विकसीत झालेले आहे. सदर उद्यानामध्ये या पूर्वी म.न.पा. कडून झुकझुक गाडी साठी तिकीटघर बांधणेत आले आहे. तिकीटघराचा आकार ३.१५ मी. X ५.१० मी. एवढा आहे. सदर तिकीटघरास ब-याच प्रमाणात तडे निर्माण झाले असून मोडकळीस आले आहे. उद्याना मध्ये तिकीटघरा भोवताली नागरीक ये-जा करीत असतात. त्यामुळे भविष्यात होणारी जिवीतहानी तसेच वित्तहानी टाळण्यासाठी सदरचे तिकीटघर हटविण्यात यावे असे ह्या विभागाचे मत आहे. सदरचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२. ब प्रभाग कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२४ (प्रभागाचे नाव – प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) चा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये कै.भागुजी गोलांडे आणि श्रीधरनगर उद्यान म.न.पा कडुन विकसित झाले आहे. सदर उद्यानामध्ये नागरिकांच्या वापरासाठी मुतारी आहे. सदरची मुतारी उद्यानाच्या बागेत आहे परंतु वापर बाहेरील बाजुने होत आहे. मुतारी दर्शनी बाजुने तसेच आतमध्ये सुस्थितीत आहे. परंतु उद्यानाच्या मागील बाजुस वडाचे मोठे झाड आहे .सदर झाडाची मुळे बांधकामाच्या पायथ्याशी गेल्याने मुतारीच्या मागील भाग धोकादायक झालेला आहे. तसेच मागील बाजूस भिंतीमध्ये झाडे उगवल्याने भिंतीना तडे पडले आहेत. सदर मुतारीचा आकार ३.४५ मी. x २.०० मी. एवढा आहे. त्यामुळे सदरची मुतारीचे पक्के बांधकाम हटवुन फायबर मुतारी ठेवणे योग्य होणार आहे.

तसेच श्रीधरनगर उद्यानात वॉचमन क्वार्टर शेजारी उद्यान विभागाचे ऑफिस आणि गोडाऊन आहे. सदरचे ऑफिस तसेच गोडाऊन जुने कौलारु स्वरुपाचे असुन भिंत ०.१० मी.जाडीची सिपोरेक्स पध्दतीची आहे. सदर खोलीचे छत पावसाळयात लिकेज होत असले बाबत उद्यानामधील कर्मचा-याचे म्हणणे आहे . सदर खोलीवर लोखंडी Truss घेवुन पत्रे टाकणे धोकादायक होणार आहे. त्यामुळे वॉचमन क्वार्टर शेजारील ऑफिस आणि गोडाऊन हटविणे आवश्यक आहे असे ह्या विभागाचे मत आहे. सदर ऑफिस आणि गोडाऊन याचा आकार ५.९०मी. X ३.६०मी. एवढा आहे.

तरी प्रभाग क्र.२४ मधील कै.भागुजी गोलांडे उद्यानातील मुतारी तसेच श्रीधरनगर उद्यानातील वॉचमन क्वार्टर शेजारील ऑफिसची आणि गोडाउनची खोली हटविणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३. ब प्रभागातील मनपा भवन उप विभागातील विविध परिसरातील विविध कार्यक्रमांसाठी वार्षिक पध्दतीने तात्पुरती ध्वनिक्षेपण, प्रकाश व जनरेटरची व्यवस्था करणेस रक्कम रुपये ९९९९९०/- अक्षरी रक्कम रुपये नऊ लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्वद रुपये फक्त चे पुर्वगणनपत्रकास व त्या प्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्र. ४. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ब प्रभाग कार्यालय क्षेत्राचा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये प्रभाग क्र. २४ (प्रभागाचे नावः- प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह ) चा समावेश होतो. सदर प्रभागामध्ये काळेवाडी फाटा ते देहुआळंदी रस्त्यापर्यंतचा बी. आर. टी.एस.कॉरीडॉर JNNURM अंतर्गत विकसीत करण्याचे काम म.न.पा कडील बी. आर. टी.एस. विभागा कडुन घेणेत आले आहे. त्या मध्ये पवना नदी ते मुंबई-पुणे लोहमार्ग व महामार्ग ओलांडण्यासाठी उड्डानपुल बांधणेचे काम चालु आहे. सदर उड्डानपुल कामामध्ये चिंचवड लिंकरोड येथे यशोपुरम् सोसायटी समोर म.न.पा चे दोन फायबर चे वाचनालय आहे.सदरचे वाचनालय रस्त्यामध्ये पुलाचे कामासाठी बाधीत होत असले बाबत बी. आर. टी.एस. विभागाने क्र.स्था/ बी. आर. टी.एस./२८४/२०१३, दि.०९/१०/२०१३ अन्वये कळविले आहे. तरी पुलाचे कामासाठी बाधित होणारे वाचनालय काढणे आवश्यक आहे. सदरचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बप्र/२/कावि/३०७/२०१३
दिनाक – १३/११/२०१३